# तिफण

वर्ष : १३ वे । अंक १ला । एप्रिल-मे-जून - २०२२



कुळवाडीभूषण

# छत्रपती शिवाजी महाराज

विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

UGC Care Listed Journal

ISSN 2231 - 573X

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,

हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३

मो. ९९०४००३९९८

| | | |
|---|---|---|
| १६. | छत्रपती शिवाजी महाराज – तर्कशुद्ध आणि सर्जनशील व्यक्तिमत्त्व<br>- डॉ. महेश भास्कर व डॉ. शिरीष गवळी | ६३ - ६७ |
| १७. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका<br>- डॉ. गणेश शिंदे व डॉ. लहू घोरपडे | ६८ - ७० |
| १८. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- सुशीला लक्ष्मण जगधने | ७१ - ७२ |
| १९. | छत्रपती शिवाजी महाराजांचा धार्मिक दृष्टिकोन : चिकित्सक मांडणी<br>- डॉ. विकास मोहन सरनाईक | ७३ - ७६ |
| २०. | शिवरायांचे आरमार आणि दूरदृष्टी<br>- डॉ. श्वेता बा. चौधारे | ७७ - ७९ |
| २१. | शिवकालीन भाषा व लेखनपद्धती<br>- डॉ. सायली आचार्य | ८० - ८४ |
| २२. | मराठी कादंबरी व ग्रंथांमध्ये आलेले छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचे संदर्भ - डॉ. सखाराम डाखोरे | ८५ - ८८ |
| २३. | मराठी कवितेत शिवाजी महाराजांचे चित्रण<br>- योगिता चोडणकर | ८९ - ९३ |
| २४. | शिवकालीन अर्थव्यवस्था : एक अभ्यास<br>- डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे व डॉ. राजाभाऊ गायकवाड | ९४ - ९६ |
| २५. | स्वराज्याचे अधिष्ठान : मुलकी शासनव्यवस्था<br>- अविनाश सुदाम भालेराव | ९७ - १०० |
| २६. | शिवरायांचा स्त्रीविषयक क्रांतिकारी धोरण<br>- शहेनाज देशमुख | १०१ - १०४ |
| २७. | सभासद बखर : महापुरुषांच्या जीवनाच्या उज्ज्वल दीप्तीमध्ये शोकांतिकेची एक अनाकलनीय किनार - कृष्णा रतन बनसोडे | १०५ - १०८ |
| २८. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- किशोर शेषराव चौरे | १०९ - १११ |
| २९. | महात्मा जोतिबा फुले यांच्या पोवाड्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तित्व<br>- डॉ. युवराज धबडगे व नागेश बोंतेवाड | ११२ - ११५ |
| ३०. | छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यकारभार आणि देशातील आजच्या लोकशाहीची झालेली अवस्था - ईश्वर रावसाहेब आडसूळ | ११६ - ११९ |
| ३१. | छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती<br>- डॉ. सुषमा देशपांडे व कविश्री देशमुख | १२० - १२३ |



# मराठी कवितेत शिवाजी महाराजांचे चित्रण

- योगिता चोडणकर
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग
विद्या प्रबोधिनी महाविद्यालय, पर्वरी- गोवा
मो. ९९२२३८१६३७१, ई-मेल : yogita13.ch@gmail.com

हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवाजी महाराजांचे मराठी कवींना नेहमीच आकर्षण वाटत आले आहे. मुघली सत्तेच्या वादळात स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवण्याची महनीय कामगिरी त्यांनी बजावली आहे. मराठी राज्याची स्थापना करून त्यांनी श्रीची इच्छा पूर्ण केली. महाराष्ट्राची अस्मिता जपली. आपले राज्य टिकवण्यासाठी आणि वाढविण्यासाठी आयुष्यभर लढा दिला. शिवाजी महाराज हे स्वातंत्र्याचे आणि महाराष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक असल्याने त्यांच्या कार्याचा अनेक कवींनी गौरव केला आहे. त्यांनी आपल्या काव्यातून शिवाजी महाराजांना वंदन केले आहे. पुन्हा शिवाजी जन्मास यावा अशी इच्छा मराठी कवींनी आपल्या काव्यातून व्यक्त केली.

प्रस्तुत शोधनिबंधात मराठी कवितेत शिवाजी महाराजांचे वर्णन कसे केले आहे आणि वर्णनाचे नेमके स्वरूप काय आहे, याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना -**

'वीर प्रतापी राय शिवाजी छत्रपती अमुचा
धर्म रक्षण्या एकाची केला घोष स्वराज्याचा
भगवा झेंडा धन्य करी हे आनंद वन भुवन
स्वातंत्र्याच्या जरीपटक्याला लक्ष वेळ नमन'

अशा शब्दांत ज्यांचा गौरव केला जातो ते शिवाजी राजे. आदिलशाह आणि मुघलांविरुद्ध ऐतिहासिक संघर्ष करून स्वराज्याची स्थापना करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रत्येक मराठी माणसाच्या मनामध्ये स्थान निर्माण केले आहे. सर्वसामान्य मावळ्यांना घेऊन इच्छाशक्ती आणि तल्लख बुद्धिमत्तेच्या आधारे त्यांनी इतिहासाच्या पानावर सोनेरी अक्षरांत आपले नाव कोरले आहे. माता जिजाऊ आणि समर्थ रामदास यांच्या मार्गदर्शनाखाली परकीयांविरुद्ध लढा उभारला. अनेकांनी फक्त शिवाजी महाराजांच्या सांगण्यानुसार स्वराज्यासाठी आपल्या प्राणाची आहुती दिली. आपले रक्त सांडले. संसाराची राखरांगोळी केली. या शूरवीर महाराजांनी आपल्या पराक्रमाने सर्वांनाच वेड लावले.

आपल्या मनातील भाव व्यक्त करण्यासाठी कविता या भावनात्मक साहित्य प्रकाराचा प्रतिभावंत अधिक अवलंब करतात. शाहिरांनी आपल्या लाडक्या शिवबाचा पराक्रम पोवाड्यातून शब्दबद्ध केला. कथा, नाटक, कविता यांच्या माध्यमातून आपल्या भावना सांगितल्या आहेत.

**काव्यलेखनाची प्रेरणा -**

मराठी मातीत शिवबाचे प्रेम रुजवावे लागत नाही. पाऊस पडल्यावर ज्या सहजतेने हिरवळ फुटून येते, त्याच सहजतेने शिवरायांचा अभिमान मराठी मनात उमलून येतो. शिवरायांच्या धैर्यवान व्यक्तिमत्त्वाने प्रतिभावंतांना आपल्या साहित्याचा विषय बनविण्यास प्रवृत्त केले. शिवाजी महाराज साहित्यात अवतरले त्याची विविध कारणे सांगता येतील.

शाहिरांनी लेखन करताना अर्थकृते हे एक महत्त्वाचे प्रयोजन होते असे दिसून येते. शाहीर अग्निदास यांनी याच हेतूने 'अफजलखान वधाचा पोवाडा' लिहिला होता. कवी भूषण शिवाजी महाराजांकडे आश्रयाला होते. त्यांनी शिवाजी महाराजांविषयक आदरभाव काव्यातून व्यक्त केला आहे.

भारतीय पुत्र ब्रिटिशांचा अत्याचार ब्रही न उच्चारता सहन करीत होते. ज्या भूमीत शिवाजी महाराजांनी, संभाजीराजांनी आपल्या पराक्रमाने सगळ्यांना दिपवून टाकले. त्याच भूमीतील पुत्र मुकाट्याने सहन करीत आहेत हे काही कवींना बघवले नाही. त्यांनी आपल्या काव्यातून अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्यास लोकांना प्रवृत्त केले. अशावेळी आपल्या कर्तृत्वाने मावळ्यांच्या मनात स्वराज्यासाठी लढण्याची उमेद निर्माण करणारे श्री शिवाजीराजे लेखकांना आपले आदर्श वाटले. त्यांच्या पराक्रमाचे वर्णन

करून लोकांना प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न केला.

उत्कृष्ट राज्यकर्ता, संघटक, दूरद्रष्टा, शासनाची जाणीव असलेला, प्रजापालक, धर्मरक्षक त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंनी सर्वांना भारावून टाकले. स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळक, जोतिबा फुले या विचारवंतांनी आपल्या लेखनातून शिवाजी महाराजांचे चित्रण केले. त्यांच्या जीवनातील प्रसंग सांगितले. वाचकांसमोर एक आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

कथनात्मक आणि नाट्यात्मक साहित्य प्रकारांपेक्षा भावनात्मक साहित्य प्रकार अधिक प्रभावी ठरतो. आपल्या मनातील भावना सहजपणे आविष्कृत करण्याचे कविता हे प्रभावी माध्यम आहे. परिणामी, अनेकांनी शिवाजी महाराजांचे गौरववर्णन आपल्या काव्यातून केला आहे.

विविध प्रेरणेने प्राचीन साहित्यापासून आजपर्यंत शिवाजी महाराज काव्याचा विषय ठरले आहे. पण प्रश्न असा निर्माण होतो की, जे लेखकाने आपल्या काव्यातून सांगितले आहे ते कितपत सत्य आहे? आपल्या आराध्याची स्तुती करताना अनेक बाबींकडे आपण दुर्लक्ष करीत असतो. परिणामी, जे शाहिरांनी लिहिले त्यात दोष असू शकतात. त्याचबरोबर आधुनिक कालखंडात कवींना जो इतिहास माहीत आहे त्याआधारे लेखन करण्यात आले आहे. काहींनी आपल्या मनातील भावना व्यक्त करीत असताना इतिहासाचा विचार केलेला नाही. परिणामी, त्यांच्या लेखनात आणि इतिहासात तफावत असण्याची शक्यता आहे.

**कवितेचे स्वरूप -**

वैभवशाली भूतकाळ व भूतकाळातील ऐतिहासिक विभूतीपासून स्फूर्ती घेण्याचा प्रयत्न अनेक कवींनी केला आहे. शिवाजी महाराज हे मराठी माणसांसाठी आदर्श आहेत. सर्वसामान्य माणसांचे ते राजे आहेत. प्रत्येक मराठी माणसाच्या मनात त्यांच्याविषयी अपार आदर आणि श्रद्धा आहे. त्याचे प्रतिबिंब आपल्याला मराठी कवितेतून पाहावयास मिळते. प्राचीन मराठी साहित्यापासून आजपर्यंत अनेक कवींनी कवितेच्या माध्यमातून शिवबांना वंदन केले आहे.

कवी गिरीश यांनी आपल्या कवितेतून शिवाजी महाराजांविषयी असलेला अभिमान व्यक्त केला आहे. 'मावळ्यांचे गाणे' या कवितेत ते लिहितात -

'भगवा झेंडा फिरवून<br>
जरीपटका मिरवून<br>
झाला सामाशेरीवर जो रावू<br>
मराठ्यांचा बाणा<br>
गेला गाजवून राणा<br>
त्येचा समाधीवर फूल वाहू'

आपल्या आराध्याविषयीचा अभिमान व्यक्त केला आहे. आपल्या आदर्श राजाचे गुणगान कवीने गायले आहे. त्यांचे माहात्म्य सांगितले आहे. त्यांना मानाचा मुजरा केला आहे. कवी लिहितात -

'शिवराय मूर्त धैर्याची<br>
कीर्त प्रतापाची<br>
शर्थ शौर्याची<br>
जीवाचे जीव सौंगडी त्यास'

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी देशाकरिता, धर्माकरिता आणि स्वातंत्र्याकरिता झटणाऱ्या थोर विभूतींना वंदन केले आहे. ते शिवाजी महाराजांच्या कार्याने भारावून गेले होते. श्री शिवछत्रपती हे त्यांचे आराध्य दैवत. त्यांनी 'श्री शिवगीत', 'शिववीर', 'श्री शिवाजी महाराजांची आरती', 'हिंदुनृसिंह' या गीतांतून शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे वर्णन केले आहे. 'हिंदुनृसिंह' कवितेत ते लिहितात -

'हे हिंदु शक्ती - संभूत- दीप्त तमतेजा<br>
हे हिंदू तपस्या - पूत ईश्वरी ओजा<br>
हे हिंदू सौभाग्य भूतीच्या साजा<br>
हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा'

त्यांनी शिवाजी महाराजांची ओघवत्या शब्दांत स्तुती केली आहे.

कवी विनायक जनार्दन करंदीकरांनी पूर्वजांच्या वैभवाचे आणि वीर वृत्तीचे लोकांना स्फर्तिदायक स्मरण करून दिले आहे. लोकांच्या मनात भारतभूमीच्या पारतंत्र्याविषयी चीड उत्पन्न करण्याचा प्रयत्न केलेला आहे. शिवाजी महाराजांचे स्मरण करणाऱ्या तीन-चार कविता त्यांनी लिहिल्या आहेत. 'शिवराजदर्शन', 'श्रीशिवगीते', 'इतिहासाचे मर्म', 'कोठला शिवाजी राजा' या कवितांच्या माध्यमातून त्यांनी शिवाजी महाराजांचे चित्रण केले आहे. 'श्रीशिवगीत' या कवितेत शिवरायांच्या पराक्रमाचे वर्णन करून त्यांचा गौरव केलेला आहे. ते लिहितात -

'शिवगायन गाऊ सप्रेम मानसे<br>
परवशता मुक्तीचे हाच पथ दिसे<br>
शिवराये समरी यवनास मर्दिले

देशाच्या पायी सर्वस्व वाहिले.'

शिवरायांची प्रेरणा परिस्थितीवर मात करण्यास उपयुक्त ठरेल, असा आत्मविश्वास त्यांना आहे. म्हणून त्यांनी आपल्या कवितेत इतिहासातील वीरांचा आदर्श भारतीयांसमोर ठेवला.

स्वातंत्र्याची स्फूर्ती देण्यासाठी इतिहासातील थोर पुरुषांचे पोवाडे कवी गोविंद ऊर्फ आबा दरेरकर यांनी गायले आहेत. 'अफजलखानाचा पोवाडा', शिवाजी प्रतापराव गुजर यांनी केलेली 'मरणाची प्रार्थना', 'जिजाबाईंचा झोका', 'हिंदू धर्म परिषदेकरिता स्वागतपर गीत' या कवितेतून त्यांनी शिवाजी महाराजांची महती गायली आहे. ते 'शिवाजी' या कवितेत शिवाजी महाराजांचा गौरव करताना लिहितात -

'देशाचा पालनवाला | तो शिवाजी राजा झाला |
धर्माचा पालनवाला | तो शिवाजी राजा झाला |'

आपल्या कवितेतून त्यांनी शिवाजी महाराजांचे माहात्म्य वर्णिले आहेत.

म. मो. कुंटे यांनी 'राजा शिवाजी' या नावाने काव्यनिर्मिती केली आहे. कवी यशवंत यांचे 'छत्रपती शिवराय' या नावाने १९६८ साली महाकाव्य प्रकाशित झाले आहे. ना. रा. मोरे यांनी 'शिवायन' लिहिले आहे. 'गाथा शिवरायांची' हे ना. धों. महानोर यांचे काव्य आहे. ज्योतिबा फुले यांनी 'शिवाजीचा पवाडा' लिहिला आहे. शिवबा हे सर्वांच्या जिव्हाळाचे असल्यामुळे सर्वांनीच आपल्या काव्यातून त्यांची स्तुती केली आहे.

शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग शब्दबद्ध केले आहेत. शिवजन्म, महाराजांचा राज्याभिषेक, थरारक असे प्रसंग आले आहेत.

शिवाजी महाराजांचा जन्म हा एक सुदिन किंवा उत्सवाचा सोहळा आहे. त्या दिनाचे वर्णन अनेक कवींनी केले आहे. 'अमुचे लढवय्ये शिवबा' या कवितेत कवी लिहितात -

'मां जिजाऊंच्या पोटी जन्मले शिवाजी
ते झाले आम्हा मराठ्यांचे छत्रपती राजे'

किंवा 'रायगड' या कवितेत कवी लिहितात -

'आठवल्या मज पहिल्या वहिल्या थोर जिजामाता
उदरात तिच्या सुरू जाहली स्वराज्याची गाथा
न जाणे कधीही तेथून शपथेवाचून पुढे कुणाला'

शिवाजी महाराजांच्या जन्माची आठवण करीत असताना कवींनी सद्य:स्थिती बघता शिवाजी महाराजांचा जन्म पुन्हा एकदा व्हावा, अशी मनोकामना व्यक्त केली आहे.

शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक हा महत्त्वाचा सोहळा आहे. त्याचे वर्णन कवी कुंजबिहारी यांनी कवितेतून केले आहे. 'सुदिन' या कवितेत ते लिहितात -

'महाराष्ट्र नरसिंह शिवाजी सिंहासनी शोभला
सुदिन हा सोन्याचा उगवला
शुभागमन स्वतंत्र्य देवीचे तोडीतसे श्रृंखला
सुदिन हो सोन्याचा उगवला'

या कवितेतून त्यांची भावना दिसून येते. 'मराठा घडी यशाचा धनी' ही त्यांची कविता लक्षवेधी आहे.

इतिहासातील घटनांची आठवण करून देणारी यशवंत दिनकर पेंढारकरांची 'देहाचा पूल' ही कविता आहे. या कवितेत मराठ्यांच्या शौर्याचे रोमांचकारी वर्णन कवीने केल आहे. विजापूरच्या मुसलमान सरदराविरुद्ध लढताना शिवाजी महाराजांना एक खंदक ओलांडून शत्रूवर चाल करून जायचे होते. त्या खंदकात लाकडे पेटवून अग्नी निर्माण केलेला होता; पण महाराजांना तो खंदक ओलांडयचा आहे असे म्हटल्यावर चार मावळ्यांनी त्यावर आपली शरीरे पसरवून आपल्या देहाचा पूल केला. हा प्रसंग सांगून ते प्रश्न विचारतात.

'का स्वराज्य तेव्हा झाले?
का स्वराज्य सांप्रत नुरले?'

ही त्यांची कविता अंगावर शहारे निर्माण करते. आपल्या देशासाठी बलिदान देण्यासाठी प्रवृत्त करणारी ही कविता आहे. १९६८ साली 'छत्रपती शिवराय' हे त्यांचे महाकाव्य प्रकाशित झाले. त्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनातील प्रसंग सांगितले आहेत.

कवी माधवानुज यांनी दुर्बल मनाला पराक्रम करण्यासाठी प्रेरणा दिली. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांनी काव्यरचना केलेली आहे. त्यांनी 'सज्जनगड', 'भवानी तलवार', 'छत्रसाल शिवाजी भेट' अशा ऐतिहासिक स्वरूपाच्या कविता लिहिल्या आहेत. अफजलखानाचा वध, शिवाजी महाराजांचा जन्म, शिवाजीराजांचा राज्याभिषेक, प्रतापराव गुजरांची कथा इत्यादी प्रसंग कवितेत येतात.

श्री छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना नरसिंहावताराशी कवी दत्त यांनी केली आहे. त्यांची कविता वर्तमानातून भविष्याचा वेध घेणारी आहे. त्यांनी 'श्री छत्रपती', 'भगवा झेंडा', 'मावळ्यास आमंत्रण' या कविता लिहिल्या आहेत. शिवाजी महाराजांचा आदर्श सांगून ते सर्वसामान्य

माणसाला अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी प्रवृत्त करताना दिसतात. 'मावळ्यास आमंत्रण' या कवितेत ते लिहितात -

'चला मावळे वीर हो या घडीला
शिवाजी रणी बोलवितो तुम्हाला'

शिवाजी महाराज आपल्याला बोलवत आहेत. ही भावना त्यांनी व्यक्त केली आहे. त्याच आशयाची कविता कवी गोविंदाग्रज यांनी लिहिली आहे. ब्रिटिशांच्या अत्याचाराविरुद्ध लढा देण्यासाठी आणि स्वदेश घडविण्यासाठी कवी गोविंदाग्रजांनी आपल्या कवितेतून शिवबांची भवानी तलवार मागितली आहे. 'लोकमान्य भारतवर्षाचा आशीर्वाद' या कवितेत गोविंदाग्रज लिहितात -

'एक सांगणे एक मागणे तेच लाखवार
मागुनी घ्यावी शिवबाची भवानी तलवार
स्वदेश भूषा स्वराज्य जननी सकळा दाखवावी
दावित दावित स्वभाग्याश्री स्त्रदेशी आणावी.'

प्रेरित करणारी ही कविता आहे.

शिवाजी महाराजांनी आपल्या भूमीसाठी बलिदान दिले. त्यांचे पांग आपण फेडू शकत नाही; पण त्यांनी आमच्यासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. सेनापती बापट 'निरोप सहावा' या कवितेत सांगतात की आम्ही शिवप्रभूचे मराठे असल्याने राष्ट्राचे पांग कसे फेडावे हे आम्हाला कळते. ते लिहितात -

'मराठे आम्ही श्री शिवाजी प्रभूचे |
आम्ही पांग फेडू ह्या अर्याभूचे |
असे पंगु का आमची राष्ट्रमाता |
आम्ही जाणतो वर्म हे पूर्ण आता |'

आपण मराठे असल्याचा अभिमान या कवितेत आहे. शिवाजी महाराजांचे वारसदार असल्याचा भाव ते व्यक्त करतात.

शिवकालीन राज्य आणि आजचे राज्य याची तुलना ही केली आहे. माया दामोदर 'शिवराज्यात' कवितेत लिहितात-

'स्त्रियांचा आदर झाला
धर्मस्थळ, धर्मग्रंथांचा
संन्याशाला अभय मिळाले
शिवराज्यात'

म्हणून शिवाजी महाराजांनी पुन्हा जन्म घ्यावा, अशी मनोकामना करतात. साधना आरोंदेकर 'इथे ओशाळला मृत्यू' या कवितेत समाजात होत असलेल्या दुष्कृत्यांचा आढावा घेतात आणि कवितेच्या शेवटी लिहितात-

'उदरी राजमाता जिजाऊंच्या
शिवाबसम ते मूल जन्मते
अन्यथा
होत राहील ऐसे दुष्कृते अन्
इथे ओशाळला मृत्यू सांगीत व्यथा'

आज समाजामध्ये या दुष्कृत संपविण्यासाठी सज्जन माणसांनी एकत्र येणे आवश्यक आहे. लोकांना एकत्र येण्याचे आवाहन कवी अमरशेख करतात. ते लिहितात -

'हा समाज शिवबा बनून मजपुढे यावा
तो साडेतीन कोटीत सामावला जावा
त्यानं शिवबा सर्जाचा कित्ता आज गिरवावा
...अवघा समाज समृद्ध सुखी बनवावा'

कवी अमरशेख यांनी मराठांच्या पराक्रमाचे, शिवबांच्या शौर्याचे वर्णन केले आहे.

'जेव्हा शिवबा सर्जा राणा आला खुल्या मैदानाला
रणी लकाकला ध्वनी 'हरहर महादेव' घुमला
उठला अवघा मराठा बाण जणू सुटला
बॉम्ब जणू फुटला दगडातही नवा जीव आला'

एका घोषाने सकारात्मक बदल होऊ शकतात. दगडानांही नवा जीव येऊ शकतो. आपल्या हितासाठी, कल्याणासाठी सर्वांनी शिवाजी महाराजांचा आदर्श आपल्यासमोर ठेवला आहे. राजा असावा तर ते शिवाजीराजांसारखा. लोकांनी त्यांचे आचार-विचार आत्मसात करण्याची आवश्यकता आहे.

**निष्कर्ष -**

- राजा छत्रपती शिवाजी आदर्श राज्यकर्ते आहेत. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे ते साहित्याचा विषय ठरले. कवितेतून शिवाजी महाराजांचे चरित्र दिसून येत नाही तर कवींनी त्यात फक्त आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. काव्याच्या माध्यमातून शिवाजी महाराजांचे चरित्र, जीवनप्रवास, त्यांच्या जीवनातील ऐतिहासिक प्रसंग कवींनी प्रभावीपणे व्यक्त केलेले आहेत. त्याअनुषंगाने त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू दिसून येतात.
- त्यांच्या आयुष्यातील काही महत्वपूर्ण प्रसंग काव्याचा विषय ठरले आहेत. उदाहरण आग्र्याच्या किल्ल्यात, सात, देहाचा पूल, रायगड, शिवजन्म असे काही प्रसंग कवींनी हाताळले आहेत. प्रसंग समान असले तरी त्यांची मांडण्याची पद्धत मात्र वेगळी झाली आहे. त्यांची शैली वेगळी ठरली आहे. त्यामुळे प्रत्येक

कविता ही वैशिष्ट्यपूर्ण आहे.

- देशासाठी आपण एकत्र यायला हवे, ही भावना कवींनी आपल्या कवितेतून व्यक्त केली आहे. तत्कालीन समाजात हे कार्य करणे अवघड असल्याकारणाने शिवाजी महाराजांचा आदर्श त्यांनी ठेवला. परिणामी, या कविता राष्ट्रीय भावना जागृत करणाऱ्या ठरल्या. या कवितांचा समावेश राष्ट्रीय कविता म्हणून करता येईल.
- इतर साहित्य प्रकारांपेक्षा कवितेच्या माध्यमातून अनेक कवींनी, तसेच सर्वसामान्य लोकांनी शिवाजी राजांविषयी आपल्या भावना शब्दबद्ध केल्या आहेत. कवितांबरोबरच कवींनी खंडकाव्य आणि महाकाव्य रचले आहेत.
- कवितांचा विचार करताना जाणवते की, आताची जी परिस्थिती आहे, त्यातून आपली सुटका करण्यासाठी पुन्हा एकदा शिवबाने जन्म घ्यायला हवा, अशी इच्छा अनेक कवींनी प्रकट केली आहे. शिवकालीन युग आणि आजचे युग याची तुलना कवींनी केली आहे.
- शिवाजी महाराज आणि मराठी भाषा हे मराठी माणसाचे अत्यंत जिव्हाळ्याचे विषय आहेत. परिणामी, आज facebook, whatsapp सारख्या सामाजिक संकेतस्थळांवर शिवाजी महाराजांविषयी अनेक कविता वाचायला मिळतात. त्यांचे कवी मात्र आपल्याला माहीत नसतात.
- काही कवितांचा विचार करता इतिहास आणि कविता यांच्यात फेरफार असल्याचे दिसून येते; पण कविता हा भावनात्मक साहित्यप्रकार आहे आणि त्यात कल्पनेला अधिक वाव असल्याकारणाने कविता म्हणून त्यांचा स्वीकार करावा लागतो.

**संदर्भ सूची -**


१. 'प्रदक्षिणा' खंड पहिला - कॉन्टिनेन्टल प्रकाशन

२. 'प्रदक्षिणा' खंड दुसरा - कॉन्टिनेन्टल प्रकाशन


◆◆◆◆◆

